दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता
vadalvartanews@gmail.com
संपादक : अजय भांगे
https://epaper.vadalvarta.com
बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | गुरुवार दि.२ जुलै २०२६ | 9422660077 | आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ | वर्ष ३ रे | अंक २९५ | पाने ४ | किंमत ४ रुपये
Beed (Mahmar) Daily Marathi | Thrusday 2 July 2026 | 9422660077 | RNI-MAHMAR / 2023 / 87555 | Year - 3rd | Issue 295 | Pages 4 | Rate 4 Rs

### 'ऑपरेशन टायगरचाच भाग म्हणजे ऑपरेशन वरळी'

**मुंबई**–शिवसेनेचे नेते आणि उद्योगमंत्री उदय सामंत यांनी पत्रकार परिषदेत उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वावर जोरदार टीका करत, सचिन अहिर यांच्या प्रवेशानंतर आता ऑपरेशन वरळी सुरू झाल्याचा दावा केला. शिवसेना (शिंदे गट) अधिक मजबूत होत असून, मुंबईसह राज्यभरातून नेत्यांचा पक्षप्रवेश सुरूच राहणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.सचिन अहिर यांच्या शिंदे गटातील प्रवेशानंतर पुढे आणखी नेते पक्षात येणार का, असा प्रश्न विचारला असता उदय सामंत म्हणाले की, पक्षप्रवेशाची प्रक्रिया रोज सुरू आहे. कालही अनेकांनी पक्षात प्रवेश केला असून सचिन अहिर यांचा प्रवेश काही लोकांना मोठा धक्का देणारा ठरला आहे. सचिन अहिर यांच्यासारखा मोठा नेता जर आमच्यासोबत येत असेल, तर महाराष्ट्रातील जनतेलाही काहीतरी घडत असल्याची जाणीव झाली आहे. हे वेगळं ऑपरेशन नाही. 'ऑपरेशन टायगर'चाच एक भाग म्हणजे 'ऑपरेशन वरळी' आहे, असा दावा त्यांनी केला.

# विधान परिषदेच्या उपसभापतीपदी सचिन अहिर यांची एकमताने निवड!

## सचिन अहिर निर्भीड आणि न्याय देणारे उपसभापती ठरतील–मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**महाराष्ट्र विधान परिषदेच्या उपसभापतीपदाच्या निवडणुकीत अखेर अपेक्षेप्रमाणे संसदीय परंपरेचा मान राखत शिवसेना (शिंदे गट) नेते सचिन अहिर यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. महायुतीचे अधिकृत उमेदवार म्हणून सचिन अहिर यांनी या पदासाठी अर्ज दाखल केला होता. तर दुसरीकडे विरोधी पक्षाकडून म्हणजेच महाविकास आघाडीतर्फे शिवसेना (ठाकरे गट) चे जगन्नाथ अभ्यंकर रिंगणात होते. सभागृहातील संख्याबळ पाहता महायुतीचा विजय निश्चित मानला जात असला, तरी सभागृहाचे कामकाज एकमताने आणि परंपरेनुसार चालावे यासाठी मंत्री चंद्रकांत पाटील यांनी विरोधी पक्षाला आपला उमेदवारी अर्ज मागे घेण्याचे आवाहन केले होते. या आवाहनाला सकारात्मक प्रतिसाद देत, ठाकरे गटाचे आमदार अनिल परब यांनी सभागृहाची इच्छा सर्वानुमते निवडीची असल्याचे सांगत आपला उमेदवारी अर्ज मागे घेण्याची घोषणा केली. विरोधी पक्षाने घेतलेल्या या सामंजस्याच्या भूमिकेनंतर सभागृहात आवाजी मतदान घेण्यात आले आणि सचिन अहिर यांची उपसभापतीपदी एकमताने बिनविरोध निवड झाल्याचे जाहीर करण्यात आले. या ऐतिहासिक क्षणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह महायुती आणि विरोधी पक्षातील सर्व प्रमुख सदस्य सभागृहात उपस्थित होते.**



दैनिक वादळ वार्ता
**मुंबई (वृत्तसंस्था)**
सचिन अहिर यांच्या निवडीनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांचे विशेष अभिनंदन केले आणि सभागृहाची उज्वल परंपरा जपत उमेदवारी मागे घेतल्याबद्दल विरोधी पक्षाचेही जाहीर आभार मानले. मुख्यमंत्र्यांनी १९९९ सालच्या आठवणींना उजाळा देत सांगितले की, मी आणि सचिन अहिर एकाच वर्षी प्रथमच विधानसभेत निवडून आलो होतो. 'अहिर' या शब्दाचा अर्थच मुळात गोपालक आणि निर्भीड असा आहे. ते अत्यंत निर्भीडपणे काम करणारे लोकप्रतिनिधी असून उपसभापतीपदाच्या आसनावर बसल्यानंतर प्रत्येक सदस्याला समान न्याय देण्याची जबाबदारी ते अत्यंत सक्षमपणे पार पाडतील, असा मला पूर्ण विश्वास आहे. मुख्यमंत्र्यांनी यावेळी माजी उपसभापती नीलम गोऱ्हे यांच्याही कार्यकाळाचा गौरव केला आणि संघर्षाच्या काळातही त्यांनी सभागृहाची प्रतिष्ठा राखत प्रभावी कामकाज चालवल्याचे नमूद केले. तसेच, सचिन अहिर यांच्या राजकीय प्रवासाचा उल्लेख करताना मुख्यमंत्री म्हणाले की, मिल कामगार संघटनेतून राजकारणाची सुरुवात करून सलग तीन वेळा विधानसभेत निवडून येणारे आणि २०१२ मध्ये राज्यमंत्री म्हणून अभ्यासूपणे काम करणारे ते नेतृत्व आहे. तांत्रिक मुद्द्यावर बोलताना मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले की, सचिन अहिर जेव्हा विधान परिषदेत आले, तेव्हा ते धनुष्यबाण चिन्हावरच आले होते, त्यामुळे तांत्रिकदृष्ट्या त्यांनी पक्ष बदललेला नाही.उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही आपल्या खास शैलीत सचिन अहिर यांचे कौतुक करत त्यांना शुभेच्छा दिल्या. क्रिकेटची उपमा देत उपमुख्यमंत्री म्हणाले, त्यांच्या नावातच सचिन आहे. एक सचिन (तेंडुलकर) देशाचे नाव उज्ज्वल करून निवृत्त झाला, आता दुसरा सचिन पॅड बांधून नव्या इनिंगसाठी सज्ज झाला आहे आणि हे मैदान तो नक्कीच गाजवेल. सचिन अहिर यांच्या कार्यशैलीवर आणि त्यांच्या नावाच्या महत्त्वावर प्रकाश टाकताना उपमुख्यमंत्री पुढे म्हणाले, प्रत्येकाची काम करण्याची एक वेगळी पद्धत असते आणि प्रत्येकामध्ये काही ना काही विशेष गुण असतात. आपल्या टीममध्ये ऑलराउंडर आणि विक्रम करणारे खेळाडू असावेत, असे प्रत्येकालाच वाटत असते. मगाशी कोणीतरी म्हटल्याप्रमाणे 'सचिन' हे नावच त्यांचे काम दाखवण्यासाठी पुरेसे आहे. गोलंदाज कोणीही असो किंवा चेंडू कितीही गतीने येऊ दे, सचिन अहिर यांना तो चेंडू नेमका दिसतो आणि त्यांचा फटकाही परफेक्ट असतो. उपमुख्यमंत्र्यांनी सचिन अहिर यांच्या सामाजिक आणि कामगार चळवळीतील कामाचा गौरव करताना, तुफान में जो शांत रहे उसे समंदर कहते हैं, जो सबके दिल पर राज करते हैं उसे सिकंदर कहते हैं अशी शायरी सादर करत त्यांचे कौतुक केले. हजारो कामगारांशी नाळ जोडलेले हे नेतृत्व केवळ राजकारणी नसून एक संवेदनशील समाजकारणी आहे, असे गौरवोद्गारही त्यांनी काढले.

# टाटा मेमोरियल मार्फत 'गुरूकृपा'मध्ये विभागीय प्रशिक्षण

## तीन जिल्ह्यातील डॉक्टर करणार मृत्युंच्या कारणांच्या वैद्यकीय प्रमाणपत्रांवर चर्चा

दैनिक वादळ वार्ता
**माजलगाव । प्रतिनिधी**
टाटा मेमोरियल केंद्र या कॅन्सरच्या क्षेत्रातील अंतरराष्ट्रीय किर्तीच्या संस्थेमार्फत माजलगावच्या गुरूकृपा शिक्षण समुहात तीन जिल्ह्यातील डॉक्टरांसाठी विभागीय प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. मृत्युंच्या कारणांचे वैद्यकीय प्रमाणपत्र या विषयांवर बीड, जालना, परभणी या तीन जिल्ह्यातील डॉक्टरांना तज्ञांच्या टीममार्फत मार्गदर्शन केले जाणार आहे.



माजलगावच्या गुरूकृपा शिक्षण समुहाच्या माध्यमातून नवनवीन उपक्रम हाती घेतले जात असतात. याचाच एक भाग म्हणून गुरूकृपा शिक्षण समुहात शनिवार दि.४ जुलै रोजी तीन जिल्ह्यातील डॉक्टरांसाठी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. मृत्युंच्या कारणांचे वैद्यकीय प्रमाणपत्र या विषयावर यात मार्गदर्शन केले जाणार आहे. बीड, जालना आणि परभणी या तीन जिल्ह्यातील शासकीय रूग्णसेवेतील डॉक्टर यात सहभागी होणार असून तशा सुचना तीनही जिल्ह्याच्या जिल्हा शल्यचिकित्सक व जिल्हा आरोग्य अधिकार्यांनी निर्गमित केले आहेत. विशेष म्हणजे या कार्यशाळेला महाराष्ट्र मेडिकल कॉन्सीलच्या वतीने सीएमईचे गुणांकन देखील मंजूर करण्यात आलेले आहे. माजलगाव सारख्या ठिकाणी टाटा मेमोरियल या अंतरराष्ट्रीय किर्तीच्या संस्थेची कार्यशाळा प्रथमच होत असून तो मान 'गुरूकृपा' समुहाला मिळाला आहे. या कार्यशाळेला उपस्थितीत राहण्याचे आवाहन टाटा मेमोरियलचे संचालक डॉ.राजेश दिक्षीत व गुरूकृपाचे डॉ.यशवंत राजेभोसले यांनी केले आहे.

# अंबरनाथ-उल्हासनगरमध्ये दुचाकी चोरीचा पर्दाफाश; दोन विधीसंघर्षग्रस्त बालके ताब्यात

दैनिक वादळ वार्ता
**उल्हासनगर । प्रतिनिधी**
मध्यवर्ती पोलीस ठाण्याच्या हद्दीतील दुचाकी चोरीच्या गुन्ह्याचा पोलिसांनी अवघ्या काही दिवसांत यशस्वी उलगडा करत दोन विधीसंघर्षग्रस्त बालकांना ताब्यात घेतले आहे. या कारवाईत चोरीस गेलेली यामाहा एफझेड-२५० दुचाकी तसेच चोरीसाठी वापरण्यात आलेली होंडा डीओ दुचाकी असा एकूण सुमारे ७० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.
या प्रकरणी मध्यवर्ती पोलीस ठाण्यात सी.आर. क्र. ३१६/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता (बीएनएस) कलम ३०३(२) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्ह्याचा तपास सुरू असताना पोलीस उपनिरीक्षक कोबरणे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार सुभाष सूर्यवंशी, पोलीस




अंमलदार प्रशांत धुळे आणि अनिल घुले यांच्या पथकाने अंबरनाथ व उल्हासनगर परिसरात तांत्रिक व गोपनीय माहितीच्या आधारे सखोल तपास केला.
तपासादरम्यान अंबरनाथ येथील दोन १७ वर्षीय विधीसंघर्षग्रस्त बालकांना ताब्यात घेण्यात आले. त्यांच्याकडून चोरीस गेलेली यामाहा कंपनीची एफझेड-२५० दुचाकी तसेच चोरीच्या गुन्ह्यात वापरण्यात आलेली होंडा कंपनीची डीओ दुचाकी हस्तगत करण्यात आली. जप्त करण्यात आलेल्या वाहनांची एकूण किंमत सुमारे ७० हजार रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले.
मध्यवर्ती पोलीस ठाण्याच्या पथकाने केलेल्या या उल्लेखनीय कामगिरीमुळे वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी संबंधित तपास पथकाचे कौतुक केले असून, परिसरातील वाहनचोरीच्या गुन्ह्यांवर आळा घालण्यासाठी अशीच प्रभावी कारवाई पुढेही सुरू राहणार असल्याचे सांगण्यात आले.

# म्यानमारमध्ये अडकलेल्या महाराष्ट्रातील तरुणांची सुरक्षित सुटका करावी, औचित्याच्या माध्यमातून वडेट्टीवार यांनी केली मागणी

## समृद्धी महामार्गावरील भीषण अपघाताबाबत विजय वडेट्टीवार यांनी वेधले सरकारचे लक्ष

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । अरविंद बनसोडे कुरनूरकर**
विधानसभेतील काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी विधानसभेत दोन गंभीर आणि जनहिताच्या विषयांवर औचित्याच्या माध्यमातून सूचना मांडत राज्य सरकारकडून तातडीने ठोस कारवाईची मागणी केली.नोकरीच्या आमिषाने म्यानमारमध्ये अडकलेल्या महाराष्ट्रातील तरुणांच्या सुरक्षित सुटकेचा मुद्दा वडेट्टीवार यांनी उपस्थित केला. बीड, नाशिक, धाराशिव, चाळीसगाव, ठाणे आदी भागांतील अनेक तरुणांना सोशल मीडियावरील आकर्षक नोकरीच्या जाहिराती दाखवून थायलंडमार्गे म्यानमारमध्ये नेण्यात आले. तेथे त्यांना तथाकथित आयटी पार्क'मध्ये डांबून १६ ते १८ तास सायबर फसवणुकीचे काम करण्यास भाग पाडले जात असल्याचे समोर आले आहे. काम करण्यास नकार दिल्यास अमानुष मारहाण करण्यात आल्याची माहिती आहे.वडेट्टीवार यांनी सांगितले की, महाराष्ट्रातील २० ते २५ तरुणांचा समावेश आहे. हा आंतरराष्ट्रीय मानवी तस्करीचा गंभीर विषय असल्याने राज्य सरकारने या तरुणांची तातडीने सुरक्षित सुटका करावी. यासोबतच वडेट्टीवार यांनी समृद्धी महामार्गावरील वाढत्या अपघातांवरही सरकारला धारेवर धरले. नुकत्याच धामणगाव रेल्वे परिसरात उभ्या कंटेनरला कारची धडक बसून चंद्रपूर जिल्ह्यातील एकाच कुटुंबातील पाच जणांचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना अत्यंत वेदनादायी असल्याचे त्यांनी नमूद केले.
महामार्गावर उभी राहणारी अवजड वाहने, अपुरी सुरक्षा व्यवस्था, आवश्यक सुविधा आणि नियंत्रण यंत्रणेचा अभाव यामुळे नागरिकांचे जीव जात असल्याचा आरोप करत, कोट्यवधी रुपये खर्चून उभारलेल्या या महामार्गावर अपघातांची मालिका थांबविण्यासाठी तातडीने प्रभावी उपाययोजना करण्याची मागणी त्यांनी केली.वडेट्टीवार म्हणाले की, हा केवळ अपघात नसून महामार्ग प्रशासनाच्या निष्काळजीपणातून घडणारी मानवनिर्मित आपत्ती आहे. त्यामुळे राज्य सरकारने या दोन्ही गंभीर प्रकरणांमध्ये तातडीने हस्तक्षेप करून आवश्यक ती कठोर पावले उचलावीत, अशी त्यांनी विधानसभेत मागणी केली.



# संपादकीय

## साद घालतो निसर्ग...

महाराष्ट्रात जन्मल्याचा; महाराष्ट्रीय असल्याचा मला नेहमी अभिमान आहे आणि पुढेही राहील. अवघा महाराष्ट्र साऱ्या देशाची शान आहे जिथे मराठी भाषा आणि संस्कृती हातात हात घालून नांदतात. या भूमीने शिवरायांची शौर्यगाथा घडताना पाहिली, थोर विचारवंत आणि संतांनी लोकसंस्कृती, लोकजागरातून सामाजिक परिवर्तनाचे धडे गिरविले. साहित्य, कला, संस्कृती आणि परंपरेचं माहेरघर म्हणून महाराष्ट्र ओळखला जाऊ लागला. महाराष्ट्राची दुसरी महत्त्वाची ओळख म्हणजे परशुरामाचा वरदहस्त लाभलेली नैसर्गिक साधनसंपत्ती. सह्याद्रीच्या रांगा, गड, किल्ले, नदी, नाले याची कृपादृष्टी महाराष्ट्रावर असल्याने सुजलाम सुफलाम, कणखर देश अर्थात महाराष्ट्र आज जगात भारी आहे. त्यामुळे वर्षभर वेगवेगळ्या ऋतूत बहरणाऱ्या वैभवसंपन्न निसर्गाची चेतनागुणोक्ती भाषा समजणं खूप आवश्यक आहे. निसर्गाचे देणे एकदाच मिळते त्याचे सार्थक करणे प्रयत्नावर अवलंबून असते. तेव्हा भरभरून देणाऱ्या निसर्गावर आपलंही प्रेम असायलाचं हवं. कोकणातल्या सागरी किनारपट्टीवरच्या अद्वितीय रूपाची मोहिनी जगभरात सगळ्यांवर पडली आहे. कडेकपऱ्यात वसलेला अखंड, बुलंद महाराष्ट्र निसर्ग भ्रमंती करणाऱ्यांना आनंद देतो हे अढळ सत्य आहे.पावसाळ्यातल्या वातावरणात मुंबईसह अवघा महाराष्ट्र निसर्गाला कवेत घेण्यास आतूर असतो. इथली थंड हवेची ठिकाणं देशाची भूषण मानली जातात. महाराष्ट्रातल्या नैसर्गिक चमत्काराच्या अनोख्या दुनियेत कुणाला ग्रीष्म भावेल, तर कुणाला पाऊस आपला मित्र वाटेल. डोळ्यांनी पाहायला अख्खा जन्म अपुरा पडेल एवढा भव्यदिव्य नैसर्गिक खजिना आपल्याकडे आहे. निसर्गाकडून पळीभर मिळताना जळी-स्थळी मिळणारा आनंद द्विगुणित व्हावा, यासाठी करा जिव्हाळा निसर्गाशी देईल तो सुखाच्या राशी याचा प्रत्यय येतो. मेघांनो, वृक्षांनो, वेलींनो, कळ्यांनो, फुलांनो तेरी भी चूप मेरी भी चूप कुणाला काही सांगू नका, कबूल? कबूल...! निसर्ग राजा ऐक सांगते गुपित जपलं रं, कुणी माझ्या मनात लपलयं रं... म्हणताना ती लाजते. ऋतू हिरवा... ऋतू बरवा म्हणत वारा गुणगुणतो, बेभान होतो. हुंकारातून ध्वनी प्रकटतो, असा बेफाम हा वारा, नदीला पूर आलेला... कशी येऊ... कशी येऊ... म्हणत सांगावा धाडतो प्रियकराला. मनात साठलेला आद्रतेचा पाऊस मिलनानंतर घन रूपात अवतरतो. रिमझिम पावसात कवी ना. धों. महानोर घन होऊन बरसतात. घन ओथंबून येती, बनांत राघू भिरती, पंखावरती सर ओघळती, झाडांतून झडझडती... घन ओथंबून झरती, नदीस सागर भरती... डोंगर लाटा वेढीत वाटा, वेढीत मजला नेती... घन ओथंबून आले, पिकांत केसर ओले... आडोशाला जरा बाजूला, साजन छैल छबिला घन होऊन बिलगला. निसर्गाच्या नानाविध कला कविमनातून व्यक्त होतात. मानवी भावभावनेला स्पर्शून जातात. जमिनीत अंकुर फुटण्याआधी बहिणाबाई लिहितात, धरित्रीच्या कुशीमध्ये, बिबियाणं निजली वर पसरली माती, जशी शाल पांघरली. तारुण्य काळातील प्रेमकळ्या आनंदाच्या तऱ्हा पावसाशी निगडित असल्याने, मानवी आयुष्य समृद्ध होण्यास मदत होते. रम्य सांजवेळी क्षितिजावरची केशर रंगाची उधळण मनास सुखावते. सागर किनारी धरती आणि नभ मिलनाचा आभास निर्माण होतो. चैतन्य लहरी उठू लागतात, उन्हं कलतात, गोधन घरी परततात. या विविधांगी रंगात सजलेल्या निसर्गाचा निर्माता कोण बरं असेल? चांदण्याप्रमाणे उसळणाऱ्या सागराच्या शुभ्रधवल फेसाळ लाटा, वालूकामय किनारा, घरट्याकडे परतणारे पक्षी, मावळतीच्या शांततेतल्या संधीप्रकाशात पसरलेला फुलांचा स्मृतीगंध सगळीकडे आषाढ पसरवतो. हिरवाईने सजलेला वट पौर्णिमेचा नखरा पाहण्यासारखा असतो. पावसाला लागलेल्या वसुंधरेच्या मिलन भेटीत तिच्यासोबत घालवलेल्या सुगंधी क्षणांचा चढता आलेख स्मृतिपटलावर उमटतो, त्यावेळी अनाकलनीय जलतरंग पाण्यावर उठतात. निसर्गाने घडविलेल्या गोष्टीत कृत्रिम सौंदर्यता काम करत नाही, तिला उठाव येत नाही. वनात, अरण्यात निसर्गाच्या स्वाभाविकतेचे घडणारे दर्शन पाहण्यासारखे असते. आसमंती आलेला पौर्णिमेचा चंद्र तारकांना आकर्षित करतो. त्याला ओढ असते मिलनाची. धरणीला प्रकाशमय करण्याची. तशीचं अंतरंगी सजणीला आस असते साजणाची. हृदयातली कालवाकालव दाखवता येत नाही. विचारांचे काहूर माजतं. थोडासा दुरावा देखील दुःखाचा डोंगर वाटू लागतो. क्षणभरही नजरेआड होऊ न देणारा ती आणि तो हृदयस्थ मखमली कप्प्यातले आठवणींचे तरंगणारे मधुकण वेचण्याच्या आनंदात गुंग असतात. निर्मलजल घेऊन सागर भेटीस निघालेली सरिता. नभांगणी आलेला सतरंगी इंद्रधनू हिंदोळा पाहून उंच डोंगरातील हिरवाई साद घालते. आभाळमाया दर्शनासाठी ढगाआड राहून याचना करू लागतो. पाण्याने भरलेले काळेकुट्ट ढग त्यांच्या इच्छेनुसार बरसतात. निळ्या आकाशात दवबिंदू साठतात. निसर्गात घडणाऱ्या ईश्वरीय शक्तीच्या दर्शनाने आपण सुखावतो. अंगभर झेलतो, मनात रुजवतो आणि प्रदीप्त पाळंमुळं चौफेर पसरण्याची स्वप्न पाहू लागतो. मन का पंछी उडू लागताचं तुझा माझा हात एक होतो. निसर्गाच्या वेगवेगळ्या भूमिकेचे मानविय दर्शन इथून दृष्टिपथात येते. कर्ताधर्ता निसर्ग अद्भुत विश्वात घेऊन जातो. श्वासाच्या स्पंदनात, हृदयातून उमटलेली आरोळी अंतरंगी साद घालते. आविष्काराची ओढ संपत नाही. निसर्गात अहंशून्यता असल्याने प्रभूस्पर्श प्राप्त करून तो फुलतो. अशा मातास्वरूप निसर्गावर केवळ प्रेम करणं आपल्या हातात असतं. संबंधित एक धागा आपणास सांभाळावा लागतो, कारण अस्वस्थ प्रकृतीला स्वस्थ बनवण्यासाठी निसर्ग हेच गुणकारी औषध मानलं जातं. ग्रीष्मातल्या उन्हाचे चटके झेलताना, पावसाच्या पहिल्या शिडकाव्यातला घमघमणारा मातीचा सुगंध तनामनात भिनतो. अंकुर फुटण्याच्या काळात सृजनशीलतेचा आविष्कार पाहायला मिळतो. आनंद स्थिर आणि चिरकाल असल्याने एखाद्या कवीप्रमाणे सगळेचं पावसाविषयी आणि निसर्गाबद्दल बोलू लागतो. कुणी कविता करतं. कुणी त्याला काही उपमा देतं.समयी दुःखावर फुंकर घालणारे हिरवे, पिवळे, निळे रानमळे दोन मनांची जुळवाजुळव करू लागतात. मग तो लोणावळ्याचा भुशी डॅम असो वा बेळगावचा आंबोली घाट, पावसाचा धुंद मनमुराद आनंद घेणारी प्रेमीयुगुल याचं परिसरात दिसतात. हौशी, कुटुंबवत्सल माणसं सहलींचं आयोजन करतात. निसर्गाच्या सान्निध्यात एक दिवसीय सहली काढली जाते. वाट पाहायला लावणारा पाऊस धो-धो कोसळल्यानंतर वाट अडवत नाही. तो ज्याच्या त्याच्या वयानिशी ज्याला त्याला अवगत होतो, प्राप्त होतो आणि व्यक्त होतो. तो लहानग्यांना कागदी होडी करायला शिकवतो. तरुणांच्या मनात प्रेमाचे मळे फुलवतो. मनात हुरहूर माजवतो. रात्रीच्या पावसात भेटायला बोलावतो, वेळी अवेळी रडू आणतो. जीव कासाविस करतो.शाळेला दांडी मारायला लावतो. सगळीकडे पाणी भरताचं कामावर सुट्टी टाकायला लावतो. घरच्या गृहिणीला कांदाभजी करायला लावतो. उतारवयात सांधे दुखतात म्हणून घरात बसून एकटक खिडकी बाहेरचा पाऊस पाहणाऱ्या आजोबांना आजीच्या गतकाळाच्या आठवणीत रमवतो. पावसाशी संधान साधणारा कौटुंबिक संवाद इथं घडतो. जगण्याच्या धावपळीत प्रत्येकाची सरस अशी कथा तयार होते. पहिल्या पावसात, गंधाळली धरणी वेड लावती जीवा झाल्या अधोरेखित आठवणी. रिमझिम धारा बरसती, सया माहेरा अंगणी पाऊस मना मनातला गातो निसर्ग गाणी. असा हा निसर्ग आणि सोबतचा पाऊस एकावेळी बहरणारे, बरसणारे असल्याने कवींसोबत सामान्यांच्याही चेतना जागृत होताना दिसतात. निसर्गाच्या प्रेमळ रूपाला साज चढताचं ओठी गाणं येत, रिमझिम गिरे सावन... सुलग सुलग जाए मन... भीगे आज इस मोसम में लगी कैसी ये लगन. मग तुम्हालाही ऐकू येतेय का अशी हाक? जाणवतोय का निसर्गाचा ध्वनी प्रतिध्वनी. चला तर ! आठवणीत असलेलं किमान एक गाणं आजचं गुणगुणूया आणि निसर्गासोबत आपणही लाल, निळ्या, हिरव्या, पिवळ्या रंगात मनसोक्त डुबूया.


# गांधी अमेरिकेत कधीच गेले नाहीत...तरी अमेरिकेत त्यांचे सर्वाधिक पुतळे का आहेत?

महात्मा गांधी कधीही अमेरिकेत गेले नाहीत. तरीही भारताबाहेर त्यांचे सर्वाधिक पुतळे अमेरिकेत उभे आहेत. हा इतिहासातील एक विलक्षण विरोधाभास आहे. ज्या व्यक्तीने एखाद्या देशाची भूमीही स्पर्श केलेली नाही, त्या व्यक्तीला त्या देशाने एवढा सन्मान का दिला? या प्रश्नाचे उत्तर शोधताना गांधींच्या व्यक्तिमत्त्वाची खरी उंची लक्षात येते.अलीकडे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सेशेल्सच्या राजधानी व्हिक्टोरिया येथील पीस पार्कमध्ये महात्मा गांधींच्या पुतळ्याला पुष्पांजली अर्पण केली. २०२२ मध्ये उभारलेला हा कांस्य पुतळा नेल्सन मंडेला आणि सेशेल्सचे पहिले राष्ट्रपती सर जेम्स मॅन्चम यांच्या पुतळ्यांच्या शेजारी उभा आहे. हा प्रसंग केवळ एका भारतीय नेत्याला वाहिलेली आदरांजली नव्हती; तो जगभर स्वीकारल्या गेलेल्या गांधी विचारांचा सन्मान होता.

भारताबाहेर महात्मा गांधींची सर्वाधिक स्मारके, पुतळे आणि अर्धपुतळे अमेरिकेत आहेत. वॉशिंग्टन, न्यूयॉर्क, सॅन फ्रान्सिस्को, अटलांटा, ह्युस्टन, शिकागो, डेन्व्हर यांसारख्या अनेक शहरांमध्ये गांधींचे पुतळे उभे आहेत. विशेष म्हणजे गांधीजी कधीही अमेरिकेत गेले नव्हते. त्यांनी तेथील जनतेशी प्रत्यक्ष संवाद साधला नाही, कोणतेही व्याख्यान दिले नाही; तरीही अमेरिकेने त्यांना आपल्या सार्वजनिक जीवनात मानाचे स्थान दिले.

याचे कारण गांधींच्या विचारांमध्ये आहे.

अहिंसा आणि सत्याग्रह या संकल्पना भारतीय तत्त्वज्ञानात पूर्वीपासून अस्तित्वात होत्या. पण त्यांना जनआंदोलनाचे आणि राजकीय परिवर्तनाचे प्रभावी साधन बनवण्याचे ऐतिहासिक कार्य गांधींनी केले. त्यांनी सिद्ध करून दाखवले की, सामर्थ्य केवळ शस्त्रात नसते; ते सत्यात, नैतिकतेत आणि जनतेच्या एकजुटीतही असते.गांधींच्या या विचारांचा सर्वाधिक प्रभाव अमेरिकेतील नागरी हक्क चळवळीवर झाला. मार्टिन ल्यूथर किंग ज्युनियर यांनी गांधींच्या अहिंसेच्या तत्त्वज्ञानाला आपल्या संघर्षाचा पाया बनवले. १९५९ मध्ये त्यांनी भारतात येऊन गांधींच्या कार्याचा अभ्यास केला. त्यांच्या नेतृत्वाखालील चळवळीने अमेरिकेतील वर्णभेदाविरुद्धच्या लढ्याला नवी दिशा दिली. त्यामुळे गांधी हे केवळ भारताचे नेते राहिले नाहीत, तर न्याय, समानता आणि मानवी प्रतिष्ठेचे जागतिक प्रतीक बनले.अर्थात, अमेरिकेत सर्वच लोक गांधींबद्दल एकाच मताचे आहेत, असे नाही.


डॉ.भारत कऱ्हाड, प्राचार्य, वराडकर महाविद्यालय दापोली, जिल्हा रत्नागिरी.

काही अभ्यासक त्यांच्या काही ऐतिहासिक भूमिकांवर टीका करतात. काही ठिकाणी पुतळ्यांबाबत वादही झाले आहेत. पण व्यापक समाजात गांधींची ओळख आजही अहिंसा, शांतता आणि मानवी हक्कांचे प्रतीक अशीच आहे. त्यामुळेच त्यांच्या पुतळ्यांची तोडफोड झाल्यावर स्थानिक प्रशासन आणि नागरिकांनी त्याचा निषेध केला आहे.

भारतात मात्र गांधींचे मूल्यांकन अनेकदा राजकीय आणि वैचारिक मतभेदांच्या चष्म्यातून केले जाते. त्यांच्यावर टीका होते, समर्थनही होते. ही लोकशाहीची ताकद आहे. मात्र एक गोष्ट लक्षात घ्यायला हवी. भारतात आपण गांधींना अनेकदा आपल्या अंतर्गत राजकारणाच्या संदर्भात पाहतो; जग त्यांच्याकडे मानवतेच्या दृष्टीने पाहते. त्यामुळे परदेशात गांधींना मिळणारा सन्मान अनेक भारतीयांना नव्याने विचार करायला भाग पाडतो.

गांधीजींनी जगाला नेमके काय दिले?

त्यांनी जगाला अहिंसेची ताकद दिली. सत्याग्रहाचे सामर्थ्य दिले. नैतिक नेतृत्वाचा आदर्श दिला. समाजपरिवर्तनासाठी हिंसेपेक्षा नैतिक धैर्य अधिक प्रभावी ठरू शकते, हा विश्वास दिला. त्यांनी दाखवून दिले की, एखादा नेता आपल्या वैयक्तिक आचरणातूनही संपूर्ण समाजाला प्रेरणा देऊ शकतो. आजही जगभरातील मानवी हक्क, लोकशाही, सामाजिक न्याय आणि शांततेच्या चळवळींमध्ये गांधींच्या विचारांचे प्रतिबिंब दिसते. म्हणूनच जगातील अनेक देशांमध्ये त्यांच्या पुतळ्यांना केवळ भारतीय इतिहासाचा भाग म्हणून नव्हे, तर मानवी मूल्यांच्या स्मारकांप्रमाणे पाहिले जाते. महात्मा गांधींच्या प्रत्येक विचाराशी सहमत असणे आवश्यक नाही. त्यांच्या काही भूमिकांवर चिकित्सक चर्चा होऊ शकते आणि ती व्हायलाही हवी. पण एक ऐतिहासिक सत्य नाकारता येत नाही-गांधींनी जगाच्या नैतिक आणि राजकीय विचारविश्वावर अमिट ठसा उमटवला आहे. म्हणूनच त्यांनी कधीही पाऊल न ठेवलेल्या अमेरिकेत आज त्यांचे सर्वाधिक पुतळे उभे आहेत.या लेखाचा खरा प्रश्न गांधी अमेरिकेत का गेले नाहीत हा नाही; तर गांधी अमेरिकेत न जाता अमेरिकेच्या मनात कसे पोहोचले हा आहे. याचे उत्तर एकच आहे-सीमा माणसांना अडवू शकतात; विचारांना नाही. गांधींचे शरीर भारतात राहिले, पण त्यांचे विचार जगभर फिरले. म्हणूनच आजही जगातील अनेक देश गांधींना भारताचे नेते म्हणून नव्हे, तर संपूर्ण मानवजातीच्या नैतिक वारशाचा एक महत्त्वाचा भाग म्हणून पाहतात.

# मराठी बांधकाम व्यावसायिक महासंघाच्या अध्यक्षपदी प्रकाश बाविस्कर; राज्यव्यापी संघटन विस्ताराचा निर्धार

## प्रत्येक जिल्ह्यात मराठी बांधकाम व्यवसायिक असोसिएशन स्थापन करून विकासकांच्या प्रश्नांसाठी प्रभावी राज्यस्तरीय व्यासपीठ उभारणार

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई | प्रतिनिधी**

पुणे येथे महाराष्ट्रातील विकासकांची शिखर संघटना असलेल्या मराठी बांधकाम व्यावसायिक महासंघाच्या राज्यस्तरीय संयुक्त बैठकीत सर्व संलग्न असोसिएशनच्या प्रतिनिधींच्या प्रकाश बाविस्कर यांची महासंघाच्या अध्यक्षपदी बिनविरोध निवड करण्यात आली. तसेच प्रमोद पाटील यांची कार्याध्यक्षपदी निवड करण्यात आली.बैठकीत महासंघाच्या भविष्यातील संघटनात्मक विस्तार, राज्यव्यापी कार्ययोजना आणि बांधकाम उद्योगाच्या हितासाठी अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले. महासंघाच्या कार्याला शासन, उद्योग व विविध क्षेत्रातील अनुभवी व्यक्तींचे मार्गदर्शन लाभावे या उद्देशाने आमदार प्रवीण दरेकर यांना महासंघाच्या संरक्षकपदाची, गजानन कीर्तिकर यांना प्रमुख मार्गदर्शकपदाची तसेच सतीश मगर यांना प्रमुख सल्लागारपदाची जबाबदारी स्वीकारण्याची विनंती करण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच बांधकाम, उद्योग, कायदा, प्रशासन आणि सामाजिक क्षेत्रातील विविध मान्यवरांचे मार्गदर्शन व सहकार्य घेऊन महासंघाची राज्यव्यापी संघटनात्मक उभारणी अधिक प्रभावीपणे करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.या बैठकीस महासंघाचे संस्थापक अध्यक्ष डॉ. सुरेश हावरे, कार्याध्यक्ष संजय कुलकर्णी, उपाध्यक्ष अजित मराठे, उपाध्यक्ष गजेंद्र पवार, सहसचिव संदीप कोल्हटकर, खजिनदार बाबासाहेब भोसले, तसेच मराठी बांधकाम व्यवसायिक असोसिएशन, पुणेचे अध्यक्ष नितीन देशपांडे, मकरंद केळकर, मराठी बांधकाम व्यवसायिक असोसिएशन, नाशिकचे अध्यक्ष संजय मोरे, अनिल धनवट, सुभाष तमखाने, सचिन चुमडे आणि समाधान सोनवणे यांच्यासह मुंबई, पुणे, नाशिक व महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांतील पदाधिकारी, विकासक आणि प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.नवनिर्वाचित अध्यक्ष प्रकाश बाविस्कर यांचे उपस्थित सर्व पदाधिकाऱ्यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.




नियुक्तीनंतर बोलताना प्रकाश बाविस्कर यांनी सांगितले की, मराठी बांधकाम व्यवसायिक महासंघाला महाराष्ट्रातील सर्वात सक्षम आणि प्रभावी राज्यस्तरीय शिखर संघटना म्हणून विकसित करण्यासाठी व्यापक संघटन विस्तार अभियान राबविण्यात येईल.

यासाठी महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यात मराठी बांधकाम व्यवसायिक असोसिएशन स्थापन करण्यात येईल. त्यानंतर प्रत्येक तालुका, शहर आणि नियोजन प्राधिकरणाच्या कार्यक्षेत्रात शाखा उभारून विकासक, अभियंते, वास्तुविशारद, सल्लागार, कंत्राटदार, पुरवठादार आणि बांधकाम क्षेत्राशी संबंधित सर्व घटकांना एका सक्षम व्यासपीठावर एकत्र आणले जाईल.

यावेळी त्यांनी स्पष्ट केले की, महासंघ राज्यातील बांधकाम उद्योगासमोरील विविध प्रश्न प्रभावीपणे शासनापुढे मांडेल. विकास परवानग्या, पुनर्विकास, नियोजन प्राधिकरणांतील अडचणी, पायाभूत सुविधा, करप्रणाली, शासन धोरणांतील विसंगती तसेच विकासकांच्या न्याय्य मागण्या शासनापर्यंत कायदेशीर व प्रभावी पद्धतीने पोहोचविण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले जातील. महासंघ केवळ समस्या मांडणारी संस्था न राहता शासनाला विकासाभिमुख, कायदेशीर आणि व्यवहार्य धोरणात्मक सूचना देणारी महाराष्ट्रातील अग्रगण्य शिखर संघटना म्हणून कार्य करेल. उद्योग, शासन आणि समाज यांच्यात सकारात्मक समन्वय निर्माण करून महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासात बांधकाम क्षेत्राचे योगदान अधिक सक्षम करण्यासाठी महासंघ कटिबद्ध राहील.बैठकीच्या शेवटी उपस्थित सर्व पदाधिकाऱ्यांनी महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यात महासंघाची संघटनात्मक बांधणी अधिक मजबूत करून बांधकाम व्यवसायिकांना एक सक्षम राज्यव्यापी व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी एकजुटीने कार्य करण्याचा संकल्प व्यक्त केला.

# कळंबोली आणि परिसरातील कायदा-सुव्यवस्था नियंत्रणात ठेवण्यात वरिष्ठ पोलीस निरीक्षक तानाजी महादेव नारनवर सक्षम

## वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र कोते पाटील यांची सहाय्यक पोलिस आयुक्त म्हणून बढती

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई | प्रतिनिधी**

कळंबोली पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षकपदी महाराष्ट्र पोलीस दलातील कर्तव्यदक्ष, शिस्तप्रिय आणि अनुभवी अधिकारी तानाजी महादेव नारनवर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. आज ( दिनांक २९ ) वरिष्ठ पोलिस निरीक्षक राजेंद्र कोते पाटील यांनी कळंबोली वरिष्ठ पोलीस निरीक्षक पदाचा पदभार त्यांच्याकडे सोपविला. त्यांच्या नियुक्तीमुळे कळंबोली आणि परिसरातील कायदा व सुव्यवस्था अधिक सक्षम होईल असा आत्मविश्वास नागरिकांनी व्यक्त केला. पोलीस अधिकारी तानाजी महादेव नारनवर हे महाराष्ट्र पोलीस दलात पोलीस निरीक्षक (Police Inspector) म्हणून कार्यरत आहेत. त्यांची मूळ गावे सोलापूर जिल्ह्यातील आहेत त्यांनी रायगड व ठाणे परिसरामध्ये उल्लेखनीय सेवा बजावत जनतेशी संवाद साधणारे आणि त्यातून गुन्हेगारीचा बीमोड करणारे अधिकारी म्हणून स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे.



त्यांनी रायगड जिल्ह्यातील जिल्हा विशेष शाखेत (District Special Branch) महत्त्वाची जबाबदारी सांभाळली आहे रायगडमधील नागोठणे आणि वडखळ पोलीस ठाणे, त्यानंतर सावंतवाडी पोलीस ठाणे (सिंधुदुर्ग), आणि नियंत्रण कक्ष रायगड येथे त्यांनी यशस्वीरित्या काम केले आहे। विशेष म्हणजे अवैध दारू आणि गोवंश तस्करी रोखण्याच्या मोहिमांमध्ये त्यांच्या पथकाने केलेल्या कारवाया उल्लेखनीय ठरल्या आहेत.

त्यांच्या उत्कृष्ट सेवेसाठी त्यांना महाराष्ट्र पोलीस महासंचालकांचे सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले आहे. त्यांच्या कार्यकाळात गंभीर गुन्ह्यांची उकल, कायदा व सुव्यवस्था राखणे आणि नागरिकांचा पोलिसांवरील विश्वास अधिक दृढ करणे या बाबींमध्ये त्यांनी उल्लेखनीय कामगिरी केली आहे.कळंबोली पोलीस ठाण्याची धुरा स्वीकारताना त्यांच्यासमोर अनेक महत्त्वाची आव्हाने असणार आहेत. शहरातील महिला सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य देणे, अवैध धंदे आणि गुटखा विक्रीवर कठोर कारवाई करणे, बाल सुरक्षेसाठी प्रभावी उपाययोजना राबविणे, तसेच हत्या, दरोडे, संघटित गुन्हेगारी आणि इतर गंभीर गुन्ह्यांवर प्रभावी नियंत्रण मिळविणे, हे त्यांच्या कार्यकाळातील प्रमुख प्राधान्यक्रम असतील.

# जिवती तालुक्यातील शेतकऱ्यांना शासकीय योजनांचा लाभ देण्यासाठी कार्यवाही करा

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मुंबई येथे आढावा बैठक

**दैनिक वादळ वार्ता**
**मुंबई । प्रतिनिधी**

चंद्रपूर जिल्ह्यातील जिवती तालुक्यातील वन क्षेत्रात जमिनी असणाऱ्या शेतकऱ्यांना विविध शासकीय योजनांचा लाभ देण्यासंदर्भात योग्य ती कार्यवाही करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली जिवती तालुक्यातील वनपट्टे संदर्भात विधिमंडळाच्या मंत्रिमंडळ सभागृहात बैठक झाली. यावेळी वन मंत्री गणेश नाईक, आदिवासी विकास मंत्री तथा चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री अशोक वुईके, आमदार देवराव भोंगळे, महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, वन विभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, चंद्रपूरच्या जिल्हाधिकारी वसुमना पंत, राजुराचे उपविभागीय अधिकारी रविंद्र माने यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.जिवती तालुक्यातील अनेक



गावांमध्ये जमीन महसूल अभिलेखात गाव म्हणून नोंद असताना वन विभागाच्या नोंदीत ती राखीव वनक्षेत्रात असल्याचे दिसून येते. त्यामुळे अनेक शेतकऱ्यांना डिजिटल सातबारा, पीएम किसानसह विविध शासकीय योजनांचा लाभ मिळण्यात अडचणी येत आहेत. १९८० पूर्वीच्या जमिनींसाठी आवश्यक कागदपत्रे उपलब्ध झाल्यास त्या वनक्षेत्रातून वगळण्याची प्रक्रिया तुलनेने सोपी आहे. मात्र १९८० नंतरच्या जमिनींसाठी वनसंवर्धन कायद्यानुसार स्वतंत्र मंजुरी आवश्यक आहे. अनेक ठिकाणी पुरेशा कागदपत्रांचा अभाव असल्याने प्रस्ताव नाकारले जात आहेत. त्यामुळे या जमिनी वन क्षेत्रातून वगळण्यासंदर्भात तातडीने सर्वोच्च न्यायालयात बाजू मांडण्यासाठी योग्य ती कायदेशीर कार्यवाही करावी. संबंधित गावांचे सर्वेक्षण करून आवश्यक पुरावे गोळा करण्यात यावे. तसेच ज्या शेतकऱ्यांचे डिजिटल सातबारा निघत नाही, त्यांना ऑफलाईन सातबारा देऊन किसान योजनांचा लाभ देण्यासंदर्भात योग्य कार्यवाही करण्याचे निर्देश मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी दिले. जिवती तालुक्यातील तेलंगणा सीमेवरील १५ गावांमधील शेत जमिनींचे हक्क ठरवून सातबारा तयार करून अभिलेखामध्ये समावेश करण्यासंदर्भात विभागीय आयुक्तांच्या समितीने केलेल्या शिफारशीनुसार तातडीने कार्यवाही पूर्ण करावी, असेही त्यांनी यावेळी सांगितले.याशिवाय घरकुल योजना, बसस्थानक, सिंचन तलाव, नगरपंचायत क्षेत्रातील विकासकामे आणि इतर मूलभूत सुविधांबाबतही तातडीने मार्ग काढण्याची सूचना मुख्यमंत्री फडणवीस यांनी केली. तसेच तालुक्यांमध्ये कोतवाल पदांची निर्मिती करण्यात येत असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

आमदार देवराव भोंगळे यांनी जिवती तालुक्यातील वन जमिनीसंदर्भात तातडीने निर्णय घेऊन शेतकऱ्यांना दिलासा देण्याची विनंती केली. जिल्हाधिकारी वसुमना पंत यांनी सादरीकरण केले.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यासमोरील डिव्हायडरची उंची कमी करण्याची मागणी

### भारतीय बौद्ध महासभेचे सार्वजनिक बांधकाम विभागाला निवेदन
### कार्यक्रमांच्या पार्श्वभूमीवर अडीच ते तीन फूट उंचीचा आग्रह

**दैनिक वादळ वार्ता**
**कंधार । प्रतिनिधी**

कंधार शहरातील महाराणा प्रतापसिंह चौक ते छत्रपती शिवाजी महाराज चौक या मुख्य मार्गावर सार्वजनिक बांधकाम विभागाकडून लोखंडी डिव्हायडर व बॅरिकेट बसविण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. मात्र, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसरात वर्षभर विविध सामाजिक, राजकीय व धार्मिक कार्यक्रम होत असल्याने या ठिकाणी उभारण्यात येणाऱ्या डिव्हायडरची उंची कमी करण्यात यावी, अशी मागणी भारतीय बौद्ध महासभा, कंधार तालुका शाखेच्या वतीने सार्वजनिक बांधकाम उपविभागाच्या उपअभियंत्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली.



निवेदनात म्हटले आहे की, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा परिसर हा कंधार शहरातील प्रमुख सार्वजनिक स्थळ असून येथे भीम जयंती, महापरिनिर्वाण दिन, धम्मचक्र प्रवर्तन दिन तसेच विविध राजकीय सभा, सामाजिक कार्यक्रम व मिरवणुका नियमितपणे आयोजित केल्या जातात. या कार्यक्रमांना मोठ्या प्रमाणावर नागरिक उपस्थित राहत असल्याने पुतळ्यासमोरील जागेचे महत्त्व अधिक आहे.

सध्या उभारण्यात येत असलेल्या लोखंडी डिव्हायडरची उंची सुमारे साडेसहा फूट असल्यामुळे मंडप उभारणे, व्यासपीठ उभारणी, मिरवणुका व अन्य सार्वजनिक कार्यक्रमांच्या आयोजनात अडथळे निर्माण होण्याची शक्यता असल्याचे महासभेने नमूद केले आहे. त्यामुळे न्यायालय ते ग्रामीण रुग्णालय या दरम्यानच्या रस्त्यावर डिव्हायडर व बॅरिकेटची उंची अडीच ते तीन फूट ठेवावी, तर उर्वरित मार्गावर नियोजित उंची कायम ठेवून काम पूर्ण करावे, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

यावेळी कंधार नगरपरिषदेचे नगरसेवक राजूभाऊ सोनकांबळे, भारतीय बौद्ध महासभेचे तालुकाध्यक्ष जितेंद्र ढवळे, सरचिटणीस नामदेव कांबळे, पर्यटन सचिव संभाजी कांबळे, आनंदराव कांबळे, सुधाकर सोनकांबळे यांच्यासह समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या निवेदनाच्या प्रती उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, मुख्याधिकारी व नगराध्यक्ष, नगरपरिषद कंधार यांनाही देण्यात आल्या असून संबंधित सर्व विभागांनी समन्वय साधून या मागणीवर सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा भारतीय बौद्ध महासभेने व्यक्त केली आहे.

# धर्मभूषण ॲड.दिलीप ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली २७ वा पर्यावरणपूरक उपक्रम; 'मन की बात'नंतर त्याच रात्री मुसळधार पावसाने यात्रेकरूंमध्ये आनंद



**दैनिक वादळ वार्ता**
**नांदेड । प्रतिनिधी**

मराठवाड्यात भरपूर पाऊस पडावा, पर्यावरण संवर्धनाला चालना मिळावी तसेच २७ वी अमरनाथ यात्रा निर्विघ्न व यशस्वी पार पडावी, या उद्देशाने धर्मभूषण ड. दिलीप ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली अमरनाथ यात्री संघ, भाजप महानगर नांदेड आणि लायन्स क्लब नांदेड सेंट्रल यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेली २७ वी रत्नेश्वरी पाऊस दिंडी रविवारी उत्साहात संपन्न झाली. या दिंडीत यात्रेकरूंनी नांदेड ते रत्नेश्वरी गड मार्गावर हजारो वृक्षबियांचे रोपण केले, तर सामाजिक वनीकरण विभाग, लोहा यांच्या सहकार्याने गडावर १०८ वृक्षांची लागवड करण्यात आली.

रविवारी सकाळी तिरंगा झेंडा दाखवून दिंडीला प्रारंभ झाला. ढोल–ताशांच्या गजरात आणि भक्तिमय वातावरणात दिंडीने रत्नेश्वरी गडाकडे प्रस्थान केले. मार्गातील विविध ठिकाणी नागरिक, सामाजिक संस्था व भाविकांनी यात्रेकरूंचे स्वागत करून अल्पोपहार, चहा आणि पिण्याच्या पाण्याची व्यवस्था केली.

झरी येथे आयोजित कार्यक्रमात सर्व यात्रेकरूंनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा 'मन की बात' कार्यक्रम सामूहिकरीत्या ऐकला. त्यानंतर पर्यावरण संवर्धन आणि जलसंधारणाचा संदेश देत यात्रेकरूंनी रत्नेश्वरी गड चढताना जांभूळ, सिताफळ, लिंबोळी, कोयीसह विविध देशी वृक्षांच्या हजारो बिया मार्गावर पेरल्या. सामाजिक वनीकरण विभागाच्या अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली गडावर १०८ वृक्षांची लागवड करण्यात आली. यावेळी प्रत्येकाने आपल्या आईच्या नावाने एक झाड लावून पर्यावरण संवर्धनाची शपथ घेतली.

रत्नेश्वरी मातेची महाआरती करून मराठवाड्यात भरपूर पाऊस पडावा, पर्यावरण समृद्ध व्हावे आणि अमरनाथ यात्रा यशस्वी व्हावी, अशी सामूहिक प्रार्थना करण्यात आली. विशेष म्हणजे, दिंडी संपल्यानंतर त्याच रात्री झालेल्या मुसळधार पावसामुळे यात्रेकरूंमध्ये समाधान आणि आनंदाचे वातावरण निर्माण झाले.

गेल्या २६ वर्षांपासून धर्मभूषण ड. दिलीप ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमामुळे रत्नेश्वरी गड परिसरात मोठ्या प्रमाणावर वृक्षसंवर्धन झाले असून पर्यावरण संरक्षणाचा प्रभावी संदेश समाजापर्यंत पोहोचत आहे. या उपक्रमाचे विविध स्तरांतून कौतुक होत असून, पर्यावरण आणि सामाजिक बांधिलकी जपणारा हा उपक्रम मराठवाड्यासाठी प्रेरणादायी ठरत आहे.

# सोनारीत 'जय गुरुदेव शेतकरी गट'ची स्थापना कस्टम हायरिंग सेंटर उभारण्याचा संकल्प

### ३० शेतकरी एकत्र; आधुनिक शेती, एफपीओ आणि कृषी यंत्रसामग्री सामायिक वापरावर भर

**दैनिक वादळ वार्ता**
**भोकर । प्रतिनिधी**

नांदेड जिल्ह्यातील भोकर तालुक्यातील मौजे सोनारी येथे शेतीचा विकास, आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रसार आणि शेतकऱ्यांचे आर्थिक सक्षमीकरण या उद्देशाने 'जय गुरुदेव शेतकरी गट' स्थापन करण्यात आला आहे. या गटात ३० महिला व पुरुष शेतकरी सहभागी झाले असून, शासकीय योजनांचा लाभ सामूहिक पद्धतीने मिळवून देणे, उत्पादन खर्च कमी करणे आणि आधुनिक शेतीला चालना देणे हे गटाचे प्रमुख उद्दिष्ट आहे. भविष्यात शेतकरी उत्पादक कंपनी (एफपीओ) स्थापन करून कस्टम हायरिंग सेंटर उभारण्याचा गटाचा संकल्प आहे. या माध्यमातून ट्रॅक्टर, रोटाव्हेटर, थ्रेशर आदी कृषी यंत्रसामग्री शेतकऱ्यांना अल्प दरात भाडेतत्त्वावर उपलब्ध करून देण्यात



येणार आहे. तसेच शेतमालावर प्रक्रिया करून थेट बाजारपेठेत विक्री व्यवस्था उभारण्याचाही गटाचा मानस आहे.

गटाच्या अध्यक्षा सौ. अरुणा राजेश्वर भूरे यांनी तालुका कृषी अधिकारी दिलीप जाधव यांची भेट घेऊन शेतकरी गट स्थापनेचा प्रस्ताव व ठराव सादर केला. यावेळी सौ. अरुणा भूरे म्हणाल्या, परमपूज्य श्री श्री रविशंकरजी गुरुदेव यांच्या प्रेरणेने आणि शासनाच्या एफपीओ योजनेचा लाभ घेण्यासाठी आम्ही ३० शेतकरी एकत्र आलो आहोत. प्रत्येक शेतकऱ्याला महागडी कृषी यंत्रे खरेदी करणे शक्य नसते. त्यामुळे कस्टम हायरिंग सेंटरच्या माध्यमातून अल्प दरात यंत्रसामग्री उपलब्ध करून देण्याचा आमचा मानस आहे. या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील युवकांना रोजगाराच्या नव्या संधीही उपलब्ध होतील.तालुका कृषी अधिकारी दिलीप जाधव यांनी या उपक्रमाचे स्वागत करत शासनाच्या विविध कृषी योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी कृषी विभागामार्फत आवश्यक ते सर्व सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.

यावेळी तालुका मंडळ कृषी अधिकारी टोम्पे, सहाय्यक तालुका कृषी अधिकारी काकडे, आत्मा तालुका गट समन्वयक आनंद बोईनवाड, गटाच्या अध्यक्षा सौ. अरुणा राजेश्वर भूरे, सचिव सौ. राजमणी माधव राजारपल्ले, सौ. सुमनबाई पोशट्टी इबीतवाड, मारोती बडगे, श्याम पाटील, नामदेव राठोड, अंकुश राठोड, प्रदीप मामीडवार, भिमराव क्यातमवार यांच्यासह सोनारी येथील ३० शेतकरी सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जात प्रमाणपत्र अवैध ठरले; उल्हासनगरातील शिवसेनेच्या आणखी एका नगरसेविकेची सदस्यता रद्द

**दैनिक वादळ वार्ता**
**उल्हासनगर । प्रतिनिधी**

उल्हासनगर महानगरपालिकेतील शिवसेना (शिंदे) गटाच्या नगरसेविका पूजा सचिन भोईर यांचे अनुसूचित जमातीचे जात प्रमाणपत्र अवैध ठरल्याने त्यांची नगरसेवक पदाची सदस्यता रद्द करण्यात आली आहे. यामुळे शिंदे गटाला सलग दुसरा राजकीय धक्का बसला असून, काही महिन्यांपूर्वी याच कारणावरून नगरसेवक विकी लबाना यांचीही सदस्यता रद्द झाली होती.



प्रभाग क्रमांक १ (ब) मधील अनुसूचित जमाती महिला राखीव जागेवरून निवडून आलेल्या पूजा भोईर यांचे जात प्रमाणपत्र ठाणे येथील कोकण विभाग अनुसूचित जमाती प्रमाणपत्र छाननी समितीने २४ जून रोजी अवैध ठरवून रद्द केले. त्यानंतर महानगरपालिका आयुक्त मनीषा आव्हाड यांनी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार आदेश काढत त्यांना २४ जूनपासून अपात्र घोषित केले.

या निर्णयामुळे उल्हासनगर महानगरपालिकेतील शिवसेना (शिंदे) गटाचे संख्याबळ ३६ वरून ३४ वर आले आहे. मात्र, वंचित बहुजन आघाडी, साई पक्ष आणि अपक्ष नगरसेवकांच्या पाठिंब्यामुळे पालिकेतील सत्तासमीकरणावर तातडीने कोणताही परिणाम होणार नसल्याचे मानले जात आहे.दरम्यान, सलग दोन नगरसेवकांची सदस्यता जात वैधता प्रमाणपत्राच्या कारणावरून रद्द झाल्याने पालिका वर्तुळात खळबळ उडाली आहे. राखीव जागांवर निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांसाठी जात वैधता पडताळणीची प्रक्रिया किती महत्त्वाची आहे, हे या प्रकरणामुळे पुन्हा अधोरेखित झाले आहे. आता प्रभाग क्रमांक १ (ब) मध्ये संभाव्य पोटनिवडणुकीच्या हालचालींकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

## नावात बदल

मी, KIZHAKKEKKARA ULAHANNAN JINESH, याद्वारे जाहीर करतो की माझ्या नावाची नोंद पूर्वी KIZHAKKEKKARA ULAHANNAN JINESH अशी होती. पासपोर्टमधील नोंदीनुसार माझे योग्य नाव KIZHAKKEKARA ULAHANNAN JINESH असे आहे. यापुढे सर्व शासकीय, कायदेशीर व इतर व्यवहारांसाठी माझे नाव KIZHAKKEKARA ULAHANNAN JINESH असेच ग्राह्य धरावे. वरील दोन्ही नावे नावाची एकच व्यक्ती आहेत.

# जागतिक अमली पदार्थ दिनानिमित्त बोरिवली पोलीस ठाणे तर्फे पथनाट्य रॅलीचे आयोजन

**दैनिक वादळ वार्ता**
**मुंबई । प्रतिनिधी**

जागतिक अमली पदार्थ दिनानिमित्त बोरिवली पोलीस ठाणे आणि समाज कल्याण विभाग मुंबई उपनगर नशाबंदी मंडळ महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विद्यमाने बोरीवली येथे रॅलीचे आयोजन नशाबंदी मंडळ महाराष्ट्र राज्य मुंबई उपनगर जिल्हा संघटिका दिशा कळंबे यांनी रॅलीचे आयोजन केले रॅलीसाठी स्काऊट गाईडचे गोखले हायस्कूलचे विद्यार्थी आणि भाऊसाहेब वर्तक महाविद्यालय राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता रॅलीचे उद्घाटन बोरीवली पोलीस स्टेशनचे ACP श्री संतोष धनवटे सरांनी केले रॅलीमध्ये विद्यार्थ्यांनी say no to drugsyes to life अशा घोषणा दिल्या यावेळी स्काऊट गाईडच्या अधिकारी श्रीमती अस्मिता मॅडम, गोखले हायस्कूल शिक्षक, शिक्षिका पल्लवी सपकाळ मॅडम हजर होत्या या सर्वांनी रॅलीसाठी खूप सहकार्य केले बोरिवली पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक ( प्रभारी ) श्री सचिन सस्ते सर जनसंपर्क अधिकारी श्री गजानन जोगदंड सर यांनी रॅलीसाठी श्री माने सर यांनी सहकार्य केले मुलांना नाष्टा देण्यात आला WPSI श्रीमती काळे मॅडमनी सर्वांना अमली पदार्थाची शपथ दिली. आणि भाऊसाहेब वर्तक महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेतील विद्यार्थ्यांनी पथनाट्य सादर केले.

# परभणीत एकही गद्दार कधी टिकला नाही

# अनेक आंडू, पांडू, बंडू आले अन् गेले

## पण शिवसेना झुकणार नाही–संजय राऊत

**दैनिक वादळ वार्ता**
**परभणी (वृत्तसंस्था)**

जगात जर्मनी आणि देशात परभणी का म्हणतात, हे मला काल खऱ्या अर्थाने कळले. शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांचे परभणीच्या वेशीवर आगमन होताच येथील जनतेने गद्दारांच्या विरोधात जोरदार एल्गार पुकारला. परभणीच्या मातीत एकही गद्दार कधी टिकू शकला नाही आणि यापुढेही टिकणार नाही. येथे अनेक आंडू, पांडू आणि बंडू आले अन् गेले; मात्र शिवसेना या ठिकाणी नेहमी मजबुतीने उभी राहिली आहे आणि पुढेही राहील, असा घणाघाती हल्लाबोल खासदार संजय राऊत यांनी केला आहे. परभणी येथील जाहीर सभेत बोलताना त्यांनी बंडखोरांचा खरपूस समाचार घेतला.संजय राऊत म्हणाले की, स्वतःला 'बंडू द बॉस' म्हणवून घेणारे प्रत्यक्षात काय आहेत, हे सर्वांना ठाऊक आहे. हा माणूस आज विकासाच्या गप्पा मारतोय. दोन वेळा आमदार आणि तीन वेळा खासदार असा सलग २० वर्षे हा माणूस सत्तेत आहे. पण या २० वर्षांत त्यांनी मतदारसंघात साधी पिठाची गिरणी सुद्धा सुरू केली नाही. हा माणूस जिल्ह्याचा काय विकास करणार? असा सवाल राऊत यांनी केला आहे.भाजप आणि केंद्र सरकारवर निशाणा साधत राऊत पुढे म्हणाले की, स्वतः भाजप आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना गेल्या १२ वर्षांत देशात विकास सापडलेला नाही, मग तुम्हाला तिकडे जाऊन काय सापडणार आहे? तुम्ही तिथे जाऊन परभणीचे दुबई किंवा सिंगापूर करणार आहात का? परभणीत आजवर ज्याने कोणी गद्दारी केली, त्याला येथील जनतेने राजकारणातून गाडल्याशिवाय सोडलेले नाही, हा इतिहास आहे.

बंडखोर खासदारांच्या संपत्तीवर बोट ठेवत संजय राऊत यांनी खळबळजनक दावा केला. कधीकाळी पत्राच्या घरात राहणारा हा माणूस आज २ हजार कोटी रुपयांचा आसामी बनला आहे, असे मला समजले आहे. ही जी काही आर्थिक ताकद त्यांना मिळाली आहे, ती केवळ शिवसेना आणि 'ठाकरे' या नावामुळेच मिळाली आहे, हे त्यांनी विसरू नये. ते म्हणतात की आम्हाला चापट मारून दाखवा; अरे, आम्ही चापट नाही मारणार, तर थेट तुडवणार! 'ऑपरेशन तुडवा' हे अशाच लोकांसाठी आहे. गद्दार दिसले तर त्यांना तुडवा, हाच बाळासाहेब ठाकरेंनी आम्हाला दिलेला आदेश आहे, असा थेट इशारा राऊत यांनी दिला.



### सत्ता आली की विकास काय असतो ते दाखवू!

**संजय राऊत म्हणाले की, परभणी हा शिवसेनेचा बालेकिल्ला आहे आणि तो शिवसेनेचाच राहील. असे अनेक बंडू येतील आणि जातील. आपल्याला उद्धव ठाकरे यांच्या पाठीशी भक्कमपणे उभे राहायचे आहे. या भागातून आगामी निवडणुकीत आपल्या पक्षाचे ४ आमदार निवडून देण्याची जबाबदारी आता शिवसैनिकांनी घेतली पाहिजे. २०२९ मध्ये आपले १०० पेक्षा जास्त आमदार असतील आणि महाराष्ट्रात आपली सत्ता आली की खऱ्या अर्थाने विकास काय असतो, हे आम्ही या गद्दारांना दाखवून देऊ.**

# गडचिरोलीत माओवाद्यांचा शस्त्रनिर्मिती कारखाना उद्ध्वस्त; ५ ते ६ टनांची लेथ मशीनसह मोठा साठा नष्ट

**दैनिक वादळ वार्ता**
**गडचिरोली । प्रतिनिधी**





महाराष्ट्रातील गडचिरोली जिल्ह्यात नक्षलविरोधी मोहिमेत सुरक्षा दलांना मोठे यश मिळाले आहे. गडचिरोली पोलिस आणि केंद्रीय राखीव पोलिस दल (सीआरपीएफ) यांनी संयुक्त कारवाई करत महाराष्ट्र–छत्तीसगड सीमेलगतच्या बालबेडा जंगल परिसरातील माओवाद्यांचा शस्त्रनिर्मिती कारखाना उद्ध्वस्त केला. तसेच जमिनीत गुप्तपणे लपवून ठेवलेला मोठ्या प्रमाणातील शस्त्रनिर्मितीचा साठा जप्त करून तो घटनास्थळीच नष्ट करण्यात आला.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गडचिरोली जिल्ह्यात माओवादी कारवाया मोठ्या प्रमाणात आटोक्यात आल्या असल्या, तरी सुरक्षा दलांवर हल्ले घडवून आणण्यासाठी माओवादी संघटना सीमावर्ती दुर्गम जंगलांमध्ये शस्त्रनिर्मिती व स्फोटक साहित्याचा साठा लपवून ठेवत असल्याची माहिती गुप्तचर यंत्रणेला मिळाली होती.

या गोपनीय माहितीच्या आधारे पोलिस अधीक्षक एम. रमेश यांच्या मार्गदर्शनाखाली २६ जून रोजी विशेष शोधमोहीम राबविण्यात आली. विशेष अभियान पथक (सी–६), प्राणहिता युनिट, बॉम्ब शोधक व नाशक पथक (बीडीडीएस) आणि सीआरपीएफच्या जवानांनी संयुक्तरीत्या ही मोहीम हाती घेतली.२७ जून रोजी बालबेडा जंगल परिसरात व्यापक शोधमोहीम राबविताना जमिनीत पुरून ठेवलेली मोठ्या प्रमाणातील शस्त्रनिर्मिती सामग्री हस्तगत करण्यात आली. यामध्ये तब्बल ५ ते ६ टन वजनाची लेथ मशीन, १५० क्लेमोर व बीजीएल पाईप, २२० बारा–बोअर पाईप, २० रायफल रॉडसाठी धातूच्या पट्ट्या तसेच शस्त्रनिर्मितीसाठी वापरण्यात येणारे इतर साहित्य जप्त करण्यात आले. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या निर्देशानुसार, सुरक्षा मानकांचे पालन करून जप्त करण्यात आलेली सर्व सामग्री घटनास्थळीच नष्ट करण्यात आली.

ही कारवाई पोलिस अधीक्षक एम. रमेश यांच्या नेतृत्वाखाली पार पडली. अपर पोलिस अधीक्षक (अभियान) कार्तिक मधिरा, अपर पोलिस अधीक्षक (प्रशासन) गोकुल राज जी., पोलिस उपअधीक्षक (अभियान) विशाल नागरगोजे यांच्या देखरेखीखाली विशेष अभियान पथक, प्राणहिता युनिट, गुप्तचर विभाग, बीडीडीएस आणि सीआरपीएफच्या जवानांनी ही मोहीम यशस्वीरीत्या पूर्ण केली.

या कारवाईमुळे माओवाद्यांच्या शस्त्रनिर्मिती क्षमतेला मोठा धक्का बसला असून महाराष्ट्र–छत्तीसगड सीमावर्ती भागातील नक्षलविरोधी अभियानाला आणखी बळ मिळाल्याचे पोलिसांनी सांगितले आहे. अभियानात सहभागी सर्व अधिकारी व जवानांचे पोलिस अधीक्षक एम. रमेश यांनी विशेष कौतुक केले.

# नसरापूर प्रकरणातील फाशीच्या शिक्षेचे सुनेत्रा पवारांकडून स्वागत

**दैनिक वादळ वार्ता**
**मुंबई (वृत्तसंस्था)**



पुणे जिल्ह्यातील नसरापूर येथील अल्पवयीन मुलीवरील अत्याचार आणि हत्येप्रकरणी न्यायालयाने आरोपी भीमराव कांबळे याला फाशीची शिक्षा सुनावल्यानंतर उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी या निर्णयाचे स्वागत केले आहे. न्यायालयाच्या या निर्णयामुळे पीडितेला आणि तिच्या कुटुंबाला न्याय मिळाल्याची भावना व्यक्त करत त्यांनी न्यायव्यवस्थेवरील विश्वास अधिक दृढ झाल्याचे म्हटले आहे.

सुनेत्रा पवार यांनी प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात सांगितले की, या प्रकरणाची सुनावणी अवघ्या दोन महिन्यांत पूर्ण करून न्यायालयाने निकाल दिला. त्यामुळे न्याय मिळवून देण्याच्या प्रक्रियेत वेग आणि प्रभावीपणा दिसून आला आहे.

त्यांनी म्हटले की, अशा प्रकारचे गंभीर गुन्हे करणाऱ्या व्यक्तींना समाजात कोणतेही स्थान नसावे. या निकालामुळे कायद्याचा धाक निर्माण होईल आणि भविष्यात अशा गुन्ह्यांना आळा बसण्यास मदत होईल, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.महिला, मुली आणि बालकांच्या सुरक्षेसाठी सरकार कटिबद्ध असून अशा प्रकरणांमध्ये तपास यंत्रणा आणि प्रशासन पीडितांच्या पाठीशी ठामपणे उभे राहील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. तसेच या खटल्यात काम करणाऱ्या सरकारी वकिलांचे त्यांनी आभार मानले.या प्रकरणात पुणे ग्रामीण पोलिसांनी तातडीने विशेष तपास पथक स्थापन करून तपास पूर्ण केला. त्याबद्दल पोलिसांचेही सुनेत्रा पवार यांनी कौतुक केले.समाज आणि सरकार यांनी एकत्रितपणे महिलांच्या आणि बालकांच्या सुरक्षेसाठी अधिक प्रभावी उपाययोजना करणे आवश्यक असल्याचे सांगत अशा घटना पुन्हा घडू नयेत, यासाठी सर्वांनी सामूहिक प्रयत्न करण्याचे आवाहन त्यांनी केले.

# 'मन की बात'मध्ये गौरवलेल्या पेटकर कुटुंबीयांचा भाजपकडून जाहीर सत्कार

## विवाह सोहळ्यात साडेतीन हजार ग्रामस्थांचा विमा उतरविणाऱ्या समाजोपयोगी उपक्रमाची सर्वत्र प्रशंसा

**दैनिक वादळ वार्ता**
**कंधार । प्रतिनिधी**



कंधार तालुक्यातील बाहदरपुरा येथील पेटकर कुटुंबीयांनी आपल्या मुलांच्या विवाह सोहळ्यानिमित्त गावातील सुमारे साडेतीन हजार नागरिकांचा विमा उतरवून सामाजिक बांधिलकीचे अनोखे उदाहरण घालून दिले. या अभिनव आणि लोकहिताच्या उपक्रमाची दखल देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'मन की बात' कार्यक्रमातून घेतल्याने कंधार तालुक्याचे नाव देशपातळीवर झळकले आहे.

पंतप्रधानांनी या उपक्रमाचे कौतुक करत समाजहिताला प्राधान्य देणारे असे उपक्रम इतरांसाठी प्रेरणादायी असल्याचे गौरवोद्गार काढले. त्यांच्या या उल्लेखानंतर पेटकर कुटुंबीयांनी सामाजिक कार्यातून कंधार तालुक्याचा नावलौकिक वाढविल्याबद्दल भारतीय जनता पार्टी, कंधार शहरच्या वतीने त्यांचा जाहीर सत्कार करण्यात आला.

सत्कार समारंभास ड. मुक्तेश्वर धोंडगे, भाजप शहराध्यक्ष गंगाप्रसाद यन्नावार, ओबीसी मोर्चाचे जिल्हाध्यक्ष उत्तम चव्हाण, भाजपचे नेते दत्ता कारामुंगे, प्रवीण बनसोडे, दिग्विजय कांबळे, तसेच माधवराव पेटकर, भगवानराव पेटकर, मनोहर पेटकर, परमेश्वर पेटकर, ज्ञानोबा भलेराव, जयपाल चव्हाण यांच्यासह अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी विवाहासारख्या आनंदाच्या प्रसंगी समाजाप्रती आपली जबाबदारी जपत राबविण्यात आलेला हा उपक्रम अनुकरणीय असल्याचे सांगितले. अशा सकारात्मक व लोकहिताच्या उपक्रमांमुळे समाजात परस्पर सहकार्याची भावना अधिक दृढ होत असून, इतरांनीही अशा सामाजिक उपक्रमांत पुढाकार घ्यावा, असे आवाहन करण्यात आले.

पेटकर कुटुंबीयांच्या या अभिनव सामाजिक उपक्रमामुळे केवळ बाहदरपुरा गावच नव्हे, तर संपूर्ण कंधार तालुक्याची ओळख देशभर पोहोचली असून, त्यांच्या समाजाभिमुख कार्याचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

# २१ कातकरी कुटुंबांना वीज द्या; अन्यथा १५ जुलैला महावितरण कार्यालयावर बेमुदत ठिय्या आंदोलन

## श्रमजीवी संघटनेचा इशारा; शेडगाव तलेवाडीतील आदिवासी वस्ती आजही अंधारात, ११ विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर वीजअभावी परिणाम

**दैनिक वादळ वार्ता**
**भिवंडी । प्रतिनिधी**



विकासाच्या गप्पा रंगत असताना भिवंडी तालुक्यातील खरीवली ग्रामपंचायत हद्दीतील शेडगाव तलेवाडी येथील २१ कातकरी आदिवासी कुटुंबे आजही वीज या मूलभूत सुविधेपासून वंचित असल्याची गंभीर बाब समोर आली आहे. अनेक वर्षांपासून सातत्याने पाठपुरावा करूनही महावितरणकडून वीज जोडणी न मिळाल्याने श्रमजीवी संघटना आक्रमक झाली असून, १४ जुलै २०२६ पर्यंत सर्व घरांना वीजपुरवठा सुरू न झाल्यास १५ जुलै रोजी महावितरण कार्यालयासमोर बेमुदत ठिय्या आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे.

शेडगाव तलेवाडीतील कातकरी वस्ती आजही अंधारात जीवन जगत आहे. वीजअभावी नागरिकांना दैनंदिन जीवनात मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असून, सर्वाधिक फटका शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना बसत आहे. या वस्तीतील ११ विद्यार्थ्यांच्या अभ्यासावर व शैक्षणिक प्रगतीवर प्रतिकूल परिणाम होत असल्याने पालकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. स्थानिक नागरिकांनी अनेक वेळा महावितरणकडे वीज जोडणीसाठी अर्ज व पाठपुरावा केला. मात्र, प्रशासनाकडून सातत्याने दुर्लक्ष करण्यात आल्याचा आरोप श्रमजीवी संघटनेने केला आहे. आदिवासी व कातकरी समाजावर होणारा हा अन्याय तातडीने दूर करण्याची मागणी संघटनेने केली आहे.

या पार्श्वभूमीवर श्रमजीवी संघटनेचे ठाणे जिल्हा उपाध्यक्ष सागर देसक, भिवंडी ग्रामीण तालुका सचिव विश्वनाथ पासारी, तालुका उपाध्यक्ष जयेश पाटील आणि अंबाडी गटाध्यक्ष मुकेश तोरणेकर यांनी महावितरणच्या कनिष्ठ अभियंत्यांना लेखी निवेदन सादर केले. या निवेदनात १४ जुलै २०२६ पर्यंत शेडगाव तलेवाडीतील सर्व २१ कुटुंबांना वीज जोडणी देण्याची मागणी करण्यात आली आहे.

संघटनेने स्पष्ट इशारा दिला आहे की, दिलेल्या मुदतीत वीज जोडणीचे काम पूर्ण न झाल्यास संबंधित कातकरी कुटुंबांसह १५ जुलै रोजी महावितरण कार्यालयासमोर बेमुदत ठिय्या आंदोलन करण्यात येईल. या आंदोलनातून निर्माण होणाऱ्या परिस्थितीची संपूर्ण जबाबदारी महावितरण प्रशासनाची राहील, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

दरम्यान, वीजसारख्या मूलभूत सुविधेसाठी आदिवासी कुटुंबांना आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागत असल्याने प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. शासनाने या प्रकरणात तातडीने हस्तक्षेप करून शेडगाव तलेवाडीतील कातकरी कुटुंबांना न्याय द्यावा, अशी मागणी स्थानिक नागरिकांनी केली आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077